# राष्ट्रीयत्वाची निवड करताना

*कॅटलोनियामधील समस्या इतर राष्ट्रराज्यांसाठीही महत्त्वाचे धडे देणारी आहे.*

'राष्ट्रीयत्वाचा प्रश्न' हा युरोपात तरी बहुतांशी सुटलेला मानला जातो. युरोपेतर जगात- विशेषतः युरोपच्या गतकालीन वसाहतींमध्ये आणि निमवसाहतींमध्ये या प्रश्नावरून अजूनही तीव्र संघर्ष व हिंसाचार निर्माण होतो, हे 'मागासपणाचं' लक्षण असल्याची प्रतिमा आंतरराष्ट्रीय माध्यमं उभी करतात. युरोपच्या ईशान्येतील कॅटलोनियातील अलीकडच्या घडामोडींनी या युरोपीय मिथकाला तडा दिला आहे.

स्पेनचे घटनात्मक न्यायालय व केंद्र सरकार यांची उघड अवज्ञा करत कॅटलोनियानं, आपल्या लोकांना विभक्त राज्याची इच्छा आहे का, हे ठरवण्यासाठी १ ऑक्टोबर २०१७ रोजी सार्वमत घेतले. यावर राज्यसंस्थेनं हिंसक कारवाई केली. तरीही मोठ्या संख्येनं लोक मतदानासाठी बाहेर पडले, तेव्हा शांततापूर्ण रितीनं चाललेल्या नागरिकांवर स्पॅनिश पोलिसांनी दंगलीच्या वेळी करतात तशी कारवाई केली आणि शेकडो नागरिक जखमी झाले. तरीही, ४२.३ टक्के लोकांनी मतदान केले, आणि त्यातील ९०.९ टक्के लोकांनी स्वातंत्र्याच्या बाजूने कौल दिला. अर्थात, स्वातंत्र्याला विरोध करणारे लोक कॅटलोनियात आहेत, त्यांनी सार्वमतावर बहिष्कार टाकला. परंतु, कॅटलोनियन राष्ट्रवादासाठी हा नैतिक विजय होता, तर स्पॅनिश राज्यसंस्थेनं हिंसाचारी भूमिका उघड यातून उघड झाली. सरकारची नाचक्की करणे हे सविनय कायदेभंगामागचं तर्कट आहे. या मार्गानं वसाहतवादविरोधी राष्ट्रवाद्यांनी गतकाळात आपली चळवळ चालवली होती. युरोपीय देशांनी त्यांच्या साम्राज्यवादी अवनतीच्या इतिहासाची उजळणी करायला हवी.

फ्रान्सिस्को फ्रँको यांच्या फासिस्ट सत्ताकाळामध्ये क्रूर दडपशाहीचा अनुभव घेतल्यानंतर कॅटलोनियाच्या स्वयंनिर्णयासाठीच्या आकांक्षा प्रबळ झाल्या. फ्रँकोच्या काळात कॅटलन भाषेवरही बंदी होती, कॅटलन नावांचा वापरही प्रतिबंधित होता. परंतु, दडपशाहीतून सांस्कृतिक नूतनीकरणाची प्रेरणा उफाळून आली. लोकांनी खाजगीमध्ये त्यांची देशी भाषा जोपासली आणि स्पॅनिशच्या सक्तीला प्रतिकार केला, त्यातून मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक व साहित्यिक संपन्नता निर्माण झाली. त्यामुळं कॅटलन राष्ट्रवाद हा ठळकपणे सांस्कृतिक व भाषिक आहे. फ्रँको यांच्या सत्ताकाळात कॅटलोनियामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकास झाला आणि हा प्रदेश युरोपातील एक सर्वांत संपन्न भाग गणला जाऊ लागला. यामुळं कॅटलन राष्ट्रवाद्यांना त्यांच्या प्रयत्नांच्या शाश्वततेविषयीचा विश्वास मिळाला. परंतु, कॅटलोनियाला आपल्या आर्थिक यशाची फळं उर्वरित स्पेनसोबत वाटून घ्यायची नाही, हा आर्थिक स्वार्थच केवळ कॅटलन राष्ट्रवादामागची प्रेरणा आहे, असा प्रचार खोटेपणाचाच आहे. प्रचारतंत्रकर्त्यांची चिंता समजण्याजोगी आहे. कॅटलोनिया गमावल्यास मोठा आर्थिक फटका बसेल याची स्पेनला जाणीव आहे. यातून इतर अनिष्ट शक्यताही निर्माण होतील, अशी भीती इतर युरोपीय देश आणि युरोपीय संघ यांच्या मनात आहे.

सध्याच्या कॅटलन सार्वमताला केला जाणारा विरोध कथित 'बेकायदेशीरपणा'च्या चौकटीतला आहे. केवळ

राष्ट्रीय सरकारंच (प्रादेशिक संस्था नव्हे) वैधरित्या सार्वमत घेऊ शकतात, या आधारावर स्पॅनिश घटनात्मक न्यायालयानं या सार्वमताला बेकायदेशीर ठरवलं. परंतु, हा युक्तिवाद अप्रामाणिक व अनाकलनीय आहे. राष्ट्रीय हद्दीचं ऐक्य टिकवणं हे राष्ट्रराज्यांचं काम असेल, तर कोणतेही राष्ट्रीय सरकार स्वतःच्या फुटीचा मार्ग मोकळा करून देईल, अशी अपेक्षा मूर्खपणाची ठरेल, हे कोणाही निःपक्षपाती निरीक्षकाला समजू शकतं. लोकांना राष्ट्र म्हणून व्यक्त होण्याचा अधिकार मिळणं आणि देश म्हणून नांदता येणं हा तर्कशुद्ध अधिकार आहे. सध्याच्या राष्ट्रराज्यांच्या घटनांमध्ये हमी देण्यात आलेल्या अधिकारांच्या आधीपासूनचा हा अधिकार आहे. राष्ट्रीय सरकारं हा अधिकार भेट देऊ शकत नाहीत किंवा काढूनही घेऊ शकत नाहीत.

राष्ट्रीय सरकारांनी घेतलेली सर्व सार्वमतं आपोआप वैधच ठरतात, असेही हा निकाल सुचवतो. अलीकडंच ब्रेक्झिटच्या निमित्तानं युरोपातून व्यक्त झालेल्या चिंतेनंतरही स्पॅनिश न्यायालयानं असा निकाल देणं अनाकलनीय ठरतं. उजव्या विचारसरणीचं एक सरकार नागरिकांमध्ये परकियांबाबत भय निर्माण करतं, वंशवाद रुजवतं आणि गतकालीन साम्राज्यवादी मानमरातब परत आणण्याची भूल करतं, त्यानंतर लोकांना सार्वमताला प्रश्न विचारतं : आपले सार्वभौम राष्ट्रीयत्व टिकवायचं की गरीब युरोपीयांकडून लूट सुरू ठेवायची? ब्रिटनवासीयांनी थोड्याशा फरकानं बहुमताद्वारे युरोपीय संघातून बाहेर पडण्याच्या बाजूनं कौल दिला, त्यानंतर सरकारनं 'लोकांची इच्छा' तत्काळ अंमलात आणण्याचा निर्णय घेतला. तत्पूर्वी हा प्रश्न संसदेकडं पाठवण्यात आला नाही किंवा लोकशाही निर्णयप्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या इतर छाननी प्रक्रियांद्वारेही त्याचा विचार झाला नाही. ब्रेक्झिटकडं पाहण्याचा हा किमान एक मार्ग आहे, आणि ब्रिटनचं सार्वमत सहन केलेल्या युरोपीयांनी याच दृष्टिकोनावर शिक्कामोर्तब केलेलं आहे. तरीही, ही सर्व प्रक्रिया वैध आणि कायदेशीर ठरते. परंतु, अनेक वर्षं अनेक 'बांधील नसलेली' सार्वमतं घेऊन, पोलिसी क्रौर्याला तोंड देऊन मतदान करणाऱ्या कॅटलन लोकांच्या कृती मात्र बेकायदेशीर ठरवल्या जातात. किंबहुना त्याबाबत राजकीय चर्चेलाही नकार दिला जातो.

कॅटलोनियातील सार्वमतासंदर्भातील घडामोडी अजूनही सुरू आहेत. कॅटलन संसदेनं स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याला मंजुरी दिली आहे, परंतु त्यांचे राष्ट्राध्यक्ष कार्ल्स पुइग्देमाँ यांनी स्पॅनिश सरकारशी चर्चा करण्याची भूमिका घेतली असून जाहीरनाम्याची अंमलबजावणी स्थगित केली आहे. परंतु, स्पॅनिश पंतप्रधान मारिआनो राजोय यांनी चर्चेला नकार दिला आहे आणि प्रादेशिक सरकार बरखास्त करण्यासाठी स्पॅनिश राज्यघटनेतील अनुच्छेद १५५चा वापर केला जाईल अशी धमकीही दिली आहे. समजुतीनं आणि सावधगिरीनं हाताळली नाही तर ही समस्या आणखी चिघळेल. युरोपीय संघ या समस्येपासून अलग राहाण्याची भूमिका घेऊ शकत नाही. सदस्य देशांच्या हितसंबंधांना व निर्णयांना ओलीस राहाण्यापलीकडं जात युरोपीय संघानं या बाबतीत पुढाकार घेऊन स्वतःच्या स्वायत्ततेचं दर्शन घडवावं, अशी केवळ आशाच करता येईल.

भारतासारख्या तुलनेनं नवख्या राष्ट्रराज्यांसाठीही कॅटलोनियातील समस्येमधून धडे घेण्यासारखे आहेत. आपल्या हद्दीतील प्रदेशांच्या राष्ट्रवादी आकांक्षांना केवळ दडपून प्रश्न सुटणार नाहीत, हे त्यांनी समजून घ्यायला हवं. लोकांना एका भूमीवर राष्ट्रीय नागरिक म्हणून कोंबण्याचे शतकानुशतकांचे प्रयत्न युरोपात किंवा इतरत्र यशस्वी झालेले नाहीत. आधुनिक राष्ट्रराज्यांची निश्चित विचारसरणी म्हणून राष्ट्रवादाचा वापर होत राहील, तोपर्यंत विद्यमान राष्ट्रराज्यांना त्यांच्या राष्ट्रीय अवकाशाच्या अंतर्गत उदयाला येणाऱ्या राष्ट्रवादांशी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून सामोरं न जाता राजकीयदृष्ट्या सामोरं जावं लागेल. ●

# गौरी जिवंत आहेत

*स्वतंत्र माध्यमांच्या वैध भूमिकेला जाणीवपूर्वक बाधा पोचवण्याच्या प्रयत्नांविरोधात आपण कृती करणं गरजेचं आहे.*

संपादक व पत्रकार गौरी लंकेश यांची त्यांच्या घरामध्ये हत्या झाली, त्याला महिना उलटून गेला असला तरी लोकस्मृतीमध्ये गौरी यांच्या स्मृती जिवंत आहेत. देशभरात त्यांच्या नावानं अजूनही निदर्शनं व जागृतीसभा होत आहेत, यावरून त्यांच्या जिवंत असण्याचे दाखले मिळतात. गांधी जयंतीचा २ ऑक्टोबर आणि गौरी लंकेश यांच्या मृत्यूला एक महिना झाला म्हणून ५ ऑक्टोबर अशा दोन दिवसांना पत्रकार, कलाकार, कार्यकर्ते, विद्यार्थी व इतर अनेकांनी रस्त्यावर उतरून निदर्शनं केली. लंकेश यांच्या मारेकऱ्यांना पकडावं अशी मागणी केली आणि 'लोकशाहीच्या हत्ये'चा निषेध केला. अनेकांमधील एक असलेल्या पत्रकाराच्या हत्येनं इतक्या प्रमाणात चेतनाजागृती कशी काय झाली?

हत्या झालेल्या लंकेश या एकमेव पत्रकार नाहीत. किंबहुना २० सप्टेंबरला शंतनू भौमिक या आणखी एका पत्रकाराला आगरतळा इथं 'इंडिजीनस पीपल्स फ्रंट ऑफ त्रिपुरा' (आयपीएफटी) या संघटनेच्या सदस्यांनी चाकूनं जीवे मारलं. या वर्षामध्येच आठ पत्रकारांच्या हत्या झालेल्या आहेत, परंतु सर्वांच्या मृत्यूची कारणं त्यांच्या कामाशी संबंधित आहेत असं म्हणता येणार नाही. लंकेश यांची हत्या मात्र एक प्रकारचा चरम बिंदू बनला आहे. गेल्या तीन वर्षांमध्ये देशातील राजकीय वातावरणामुळं प्रोत्साहन मिळाल्यानं भयंकर वाढलेल्या प्रमाणातील हत्या, हिंसक हल्ले व जमावाकडून जीवे मारण्याचे प्रकार यांमुळं अस्वस्थ झालेले विविध नागरी समाज गट (यांमध्ये पत्रकारही आले) या निमित्तानं एकत्र आले आहेत.

लंकेश व भौमिक यांच्या हत्यांनंतरचा मध्यवर्ती मुद्दा केवळ पत्रकारांच्या जीविताला असलेला धोका एवढाच उरलेला नाही, तर लोकशाहीमधील स्वतंत्र माध्यमांच्या अस्तित्वाला असलेला धोकाच केंद्रस्थानी आलेला आहे. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधी यांच्या मते 'राष्ट्र'च धोक्यात होतं, त्यामुळं प्रसारमाध्यमांना मोकळेपणानं कामकाज करून देण्यात त्यांच्या मते काही अर्थच नव्हता. त्यामुळं इंदिरा यांनी प्रस्थापित कायद्यांचा वापर करून आणीबाणी जाहीर केली आणि प्रसारमाध्यमांवर निर्बंध लादले/ सेन्सॉरशिप लादली. आज 'अघोषित' आणीबाणीविषयी लोक बोलत आहेत. यामध्ये थेट प्रत्यक्ष स्वरूपाची सेन्सॉरशिप नाही. परंतु एनडीटीव्हीचे पत्रकार रविश कुमार यांनी केलेला शब्दप्रयोग वापरायचा तर 'भयरोपणाचा राष्ट्रीय प्रकल्प' सध्या सेन्सॉरशिपचंच काम करतो आहे. पाच सप्टेंबरपासून कुमार व इतर अनेक स्वतंत्र विचारी पत्रकारांना धमक्यांचे संदेश देण्यात आले आहेत. लंकेश यांच्यासारखीच त्यांची गत केली जाईल, असा या संदेशांचा आशय राहिला आहे. या धमक्या देणाऱ्यांपैकी किमान एका व्यक्तीची तरी ओळख पटली आहे आणि या व्यक्तीला समाजमाध्यमांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी 'फॉलो' करत असल्याचंही निदर्शनास आलं आहे. मोदींनी या व्यक्तीला तंबीही दिलेली नाही आणि आपल्या यादीतून त्याला काढूनही टाकलेलं नाही. अशी जाणीवपूर्वक दाखवलेली निष्क्रियता आणि कोणत्याही मतभिन्नतेला व टीकेला 'राष्ट्रा'विरोधातील हल्ला मानण्याची विद्यमान सरकारची वृत्ती यातून स्पष्ट संदेश दिला जातो: रविश कुमार यांच्यासारख्या लोकांवर हल्ला करणं किंवा 'राष्ट्रद्रोही' पत्रकारांची हत्या करणं, हे वैध आहे!

त्याच वेळी आणखीही एक मुद्दा उपस्थित होतो. काही पत्रकारांना हत्येच्या धमक्या आल्या असल्या तरी त्यांनी संरक्षणासाठी विशेष कायद्याची मागणी

करावी का? चालू वर्षी एप्रिलमध्ये महाराष्ट्र सरकारनं 'महाराष्ट्र माध्यमकर्मी व माध्यमसंस्था (हिंसा व मालमत्ता विध्वंस वा हानी प्रतिबंधक) अधिनियम, २०१७' मंजूर केला. अशा प्रकारच्या कायद्याची मागणी करताना माध्यमस्वातंत्र्याविषयी काही गंभीर प्रश्न उपस्थित होतात. राज्यसंस्थेशी अनेकदा संघर्षरत असलेल्या माध्यमांनी कोणत्याही प्रकारच्या विशेष वागणुकीची मागणी करावी का? शक्तिस्थानी असलेल्यांना उघडं पाडल्यामुळं कार्यकर्त्यांच्या (उदाहरणार्थ- माहिती अधिकार कायद्याचा वापर करणारे कार्यकर्ते) हत्या होत असतात, अशा वेळी हेच काम ज्यांनी करणं अपेक्षित आहे त्या पत्रकारांनी विशेष संरक्षणाची मागणी करावी का? सत्तेसमोर सत्य बोलण्याची वैध भूमिका मान्य असलेला समाज हेच पत्रकारांचं व कार्यकर्त्यांचं सर्वोत्तम संरक्षणकवच असतं.

स्वतंत्र माध्यमांच्या विरोध करण्याच्या भूमिकेतील वैधता ऱ्हास पावत आहे, त्याचीही चर्चा करण्याची गरज आहे. अतिशय हानिकारक पद्धतीनं हे घडवलं जातं आहे. अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जवळपास दैनंदिन पातळीवर अमेरिकेतील मुख्यप्रवाही प्रसारमाध्यमांना 'बनावट' माध्यमं असं संबोधून दर्पोक्ती सुरू ठेवली आहे, तितक्या उघडपणे हे प्रकार भारतात होत नसले, तरी प्रक्रियेमध्ये साम्य आहे. या प्रक्रियेची सुरुवात मे २०१४मध्ये मोदी सत्तेत आल्यापासून झाली. प्रसारमाध्यमांशी आपण प्रत्यक्ष संवाद साधणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. पंतप्रधानपदाची सूत्रं हातात घेतल्यापासून त्यांनी एकही पत्रकार परिषद घेतलेली नाही. आपल्याविषयी सहानुभूती बाळगणाऱ्या दोनेक माध्यमसमूहांना त्यांनी 'एक्सक्लुझिव्ह' मुलाखती तेवढ्या दिल्या आहेत. आवश्यक ती प्रसिद्धी करण्यात आलेल्या बैठकींमधील उपदेश, 'मन की बात' हा मासिक कार्यक्रम आणि पंतप्रधानांचं व त्यांच्या सरकारचं गौरवीकरण करणाऱ्या वर्तमानपत्रीय जाहिराती- अशा मार्गांनी मोदी भारतीय जनतेसमोर स्वगतं सादर करतात. प्रसारमाध्यमांना टाळण्याच्या मोदींच्या निर्णयावर मोठ्या माध्यमसमूहांनी प्रश्न का उपस्थित केलेले नाहीत? प्रश्नांना उत्तरं देणं- टीकात्मक प्रश्नांचीही दखल घेणं, हे लोकनियुक्त पदाधिकाऱ्याचं कर्तव्य असताना, पंतप्रधानांनी मुलाखत देऊन आपल्यावर उपकार केल्यासारखी वक्तव्यं काही पत्रकार का करतात? अशा प्रकारच्या प्रश्नांची दखल घेऊन लोकांना आपण उत्तरदायी असल्याचं संबंधित पदाधिकारी सिद्ध करत असतो. आणि असे प्रश्न तो टाळत असेल तर तो लोकांच्या विचारांची फिकीर करत नसल्याचं सिद्ध होत असतं. ही वृत्ती लोकशाहीविरोधात जाणारी आहे.

वैध प्रश्न विचारण्याचा अधिकार प्रसारमाध्यमांना नाकारणारं सरकार सत्तेत आहे, हे माध्यमस्वातंत्र्याच्या ऱ्हासामागचं एक कारण झालं. पण या ऱ्हासाला इतरही काही घटक कारणीभूत आहेत. गैरसोयीच्या माध्यमसमूहांना विकत घेण्याचं काम सरकारशी जवळीक असलेले उद्योगपती करतात, मग सरकारवर टीका करणाऱ्या संपादकांना काढून टाकण्यापर्यंत त्यांना मजल मारता येते. चिकित्सक अभिव्यक्तीचा माध्यमांमधील अवकाश लक्षणीयरित्या संकोच पावला आहे. शिवाय, माध्यमउद्योगातील अटीतटीच्या स्पर्धेमुळं व्यापक प्रश्नांवर पत्रकारांमध्ये ऐक्य दिसण्याची शक्यताही कमी झाली आहे. आजघडीला, परिणामकारक पत्रकार संघटनांची संख्या मोजकी आहे, प्रेस क्लब हे बहुतेकदा सरकारला वा खाजगी उद्योगांना निष्ठा वाहून असतात, आणि केवळ हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या स्वतंत्र संघटना पत्रकारांना एकत्र आणतात. या वास्तवाच्या पार्श्वभूमीवरही, लंकेश यांच्या मृत्यूनंतर जागृत पत्रकारांनी रस्त्यावर येऊन निदर्शनं केली हे महत्त्वाचं आहे. परंतु, ही निदर्शनं केवळ पत्रकारांच्या सुरक्षिततेची मागणी करण्यापलीकडं जायला हवीत. राज्यसंस्था व सत्ताधारी यांच्या विरोधात उभं राहाण्याची माध्यमांची वैध भूमिका संपुष्टात येऊ नये, यासाठी प्रतिकार करण्याचं काम या निदर्शनांमधून व्हायला हवं. ●



प्रकाशन दिनांक १-११-२०१७

## विषण्ण करणारी उत्पन्नविषयक विषमता

*उत्पन्नातील विषमतेचं स्पष्टीकरण करताना अनुभवाधिष्ठित पातळीच्या पलीकडं पाहाण्याची आत्यंतिक निकड आहे.*

भारतातील भांडवलशाहीतून उत्पन्न झालेल्या विषण्णकारी विषमता लख्खपणे सगळ्यांसमोर आहेत. परंतु यासंबंधीची सुस्पष्ट आकडेवारी देण्याचं काम 'कॅपिटल इन द ट्वेन्टी-फर्स्ट सेन्च्युरी' या प्रसिद्ध ग्रंथाचे लेखक थॉमस पिकेटी आणि 'पॅरिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मधल्या 'वर्ल्ड इनइक्वालिटी लॅब' इथले त्यांचे सहकारी लुकाच चान्सेल यांनी केलं आहे. या दोघांनी दिलेली आकडेवारी उत्पन्नविषयक विषमतेची आहे. 'इंडियन इन्कम इनइक्वालिटी, १९२२-२०१४' (उपशीर्षक: 'फ्रॉम ब्रिटिश राज टू बिलेनियर राज'/ ब्रिटिश राजवटीपासून अब्जाधीशांच्या राजवटीपर्यंत) या निबंधामध्ये देण्यात आलेली ही आकडेवारी भारतीय अकादमिक अर्थशास्त्रज्ञांना या विषयासंबंधी जागं करणारी आहे आणि सतत उत्तेजित असणाऱ्या पत्रकारांनाही या निमित्तानं स्वतःच्या विचारांना चालना देता येऊ शकणारी आहे.

चॅन्सेल-पिकेटी यांच्या निबंधानुसार, गेल्या तीन दशकांमध्ये सर्वोच्च स्तरातील एक टक्के लोकांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढण्याचं सर्वाधिक प्रमाण भारतात आहे. १९८२-८३ साली या एक टक्क्यांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ६.२ टक्के होता, तो वाढून २०१३-१४ साली २१.७ टक्क्यांवर पोचला आहे. आयकराची सुरुवात १९२२ साली झाली, त्यानंतर ब्रिटिश काळामध्ये १९३९-४० या वर्षी सर्वोच्च स्तरीय एक टक्क्यांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा सर्वाधिक- २०.७ टक्के- झाला होता. तेव्हापासूनचा उच्चांक स्वातंत्र्योत्तर भारतात २०१३-१४ साली गाठला गेला.

भारताच्या भीषण विषमतेनं भरलेल्या विकासप्रक्रियेबाबतच्या इतरही काही महत्त्वाच्या बाजू अधोरेखित करणं गरजेचं आहे. १९८०-२०१४ या काळात तळातील ५० टक्के प्रौढ (२० वर्षांवरील) लोकसंख्येचं उत्पन्न ८९ टक्क्यांनी वाढलं आणि मध्यम स्तरातील ४० टक्के (मध्यम उत्पन्नाच्या वर आणि सर्वोच्च १० टक्के उत्पन्नधारकांच्या खालच्या स्तरातील) लोकसंख्येचं उत्पन्न ९३ टक्क्यांनी वाढलं. या तुलनेत सर्वोच्च स्तरातील १० टक्के, १ टक्के, ०.१ टक्के, ०.०१ टक्के अशा उपस्तरांमधील लोकसंख्येचं उत्पन्न अनुक्रमे ३९४ टक्के, ७५० टक्के, १,१३८ टक्के, १,८३४ टक्के व २,७२६ टक्के अशा प्रमाणात वाढलं. सर्वोच्च स्तरातील एक टक्के लोकांच्या उत्पन्नातील वाढीचा दर (७५० टक्के) आणि सर्व प्रौढ लोकसंख्येच्या उत्पन्नातील वाढीचा दर (१८७ टक्के) यांच्यातील तफावत भारतामध्ये इतर देशांच्या तुलनेत बहुधा सर्वाधिक आहे. चीनमध्ये १९८०-२०१४ या काळात तळातील ५० टक्क्यांचं उत्पन्न ३१२ टक्क्यांनी वाढलं, तर भारतामध्ये तळातील ५० टक्क्यांचं उत्पन्न या काळात केवळ ८९ टक्क्यांनी वाढलं. याच काळामध्ये चीनमधली मध्यम स्तरीयांचं उत्पन्न ६१५ टक्क्यांनी वाढलं, तर भारतात याच उत्पन्न स्तरातील लोकांचं उत्पन्न याच कालावधीमध्ये केवळ ९३ टक्क्यांनी वाढलं. एकदम सर्वोच्च स्तरातील लोकांच्या (म्हणजे ०.००१ टक्के लोक) उत्पन्नातील वाढ भारतात २,७२६ टक्के राहिली, तर चीनमध्ये हाच आकडा २,५४६ टक्के असल्याचं दिसतं.

गेल्या तीन दशकांमध्ये चीन व भारत दोन्ही ठिकाणी विषण्णकारी विषमतेद्वारेच विकास झाल्याचं दिसतं, परंतु १९८०-२०१४ या कालावधीमध्ये भारताच्या तुलनेत चीनमध्ये विकासप्रक्रिया कमी विषम राहिली. (अर्थात, जनमताच्या मुक्त अभिव्यक्तीला मुभा देण्याच्यासंदर्भात चीनला लोकशाही मानलं जात नाही- हा एक भेद दोन देशांमध्ये आहे). चीनमधील तळातील

९० टक्के लोकसंख्येनं राष्ट्रीय उत्पन्नात ५६ टक्के वाटा उचलला आहे, त्या तुलनेत भारतातील तळातल्या ९० टक्के लोकसंख्येचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा केवळ ३४ टक्के राहिला आहे. (चीन, फ्रान्स व अमेरिका यांच्या तुलनेत) भारतामध्ये मध्यम स्तरातील ४० टक्क्यांना या कालावधीमधील एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढाचा सर्वांत कमी लाभ झाल्याचं दिसतं. गेल्या तीन दशकांमधील राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीचा प्रमाणाबाहेर लाभ केवळ सर्वोच्च स्तरातील १० टक्के लोकसंख्येला (२०१४मध्ये यांमध्ये आठ कोटी प्रौढ व्यक्ती होत्या) झालेला आहे. 'शायनिंग इंडिया' म्हणून गणता येईल अशा या स्तरानं राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीचा ६६ टक्के वाटा उचलला.

भारतातील ही 'शायनिंग' अवस्था केवळ श्रीमंतांनाच अनुभवायला मिळत आहे, या सर्वज्ञात वस्तुस्थितीला आकडेवारी जोड देण्याचं महत्त्वाचं काम चॅन्सेल-पिकेटी यांच्या शोधनिबंधानं केलं आहे. परंतु उत्पन्नातील विषमतेचं विश्लेषण करताना अनुभवाधिष्ठित पातळीच्या पलीकडं हा निबंध जात नाही. आकडे स्वतःविषयी काहीच सांगत नसतात, त्यांचा अर्थबोध होण्यासाठी सिद्धान्ताची गरज असते. शिवाय, या निबंधाच्या बाबतीत नोंदवण्यात आलेली आकडेवारी ही मुख्यत्वे करविषयक संपत्तीघोषणेवरून काढलेली आहे. अनेकदा अशी जाहीर केलेली संपत्ती खोटी असते, अशी शंका घेण्याला मोठा वाव आहे. बड्या उद्योगांवर नियंत्रण असलेल्या अतिश्रीमंतांच्या बाबतीत व्यक्ती म्हणून त्यांचं उत्पन्न आणि त्यांच्या नियंत्रणाखालील उद्योगांचं उत्पन्न यांच्यातील भेद किमान अंशतः तरी कृत्रिम असतो. उदाहरणार्थ, त्यांचे वैयक्तिक पातळीवरचे अनेक उपभोग खर्च कंपनीचे खर्च म्हणून नोंदवले जातात. विख्यात अर्थशास्त्री धनंजय गाडगीळ यांनी १९४९ साली लिहिलं होतं की, 'श्रीमंतांकडून होणारी करबुडवेगिरी हे भारतीय आर्थिक परिस्थितीचं एक कायमचं लक्षण मानावं लागेल' (पॅसिफिक अफेअर्स, जून १९४९, पान १२२). गाडगीळांचं हे निरीक्षण १९२२-२०१४ या संपूर्ण कालावधीला लागू होतं. या पार्श्वभूमीवर चॅन्सेल-पिकेटी यांनी उत्पन्न विषमतेविषयी नोंदवलेले अंदाज हे वास्तवातील विषमतेपेक्षा कमीच असण्याची शक्यता आहे.

सर्वोच्च स्तरातील १० टक्के, आणि विशेषतः सर्वोच्च एक टक्के लोकांचं बहुतांश उत्पन्न व्यवसायातील नफा, समभाग लाभ, कर्जरोखे, जमीन व इमारतींचं भाडं, पगार व व्यवसायांवरील नियंत्रणातून मिळणारा बोनस, अशा प्रकारचं असण्याची शक्यता जास्त असते. म्हणजेच कामातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा मालमत्तेवर मिळणारं उत्पन्न असं त्याचं स्वरूप असतं. शिवाय, गेल्या तीन दशकांमध्ये श्रम उत्पादकतेच्या तुलनेत वास्तव वेतन कमी झालं असण्याची शक्यता आहे, त्यामुळं मूल्यवर्धित संदर्भामध्ये कामातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा मालमत्तेतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा वाढलेला असेल. मालमत्तेतून मिळणाऱ्या उत्पन्नामध्येही मक्तेदारी सत्ता कमी करण्यासाठीच्या कायदेशीर कृती टाळल्यामुळं काही मोजक्या बड्या धेंडांकडंच नफा केंद्रीत झाला आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील अवमूल्यन झालेल्या संपत्ती, खनिजं व वनस्त्रोत, जमीन आणि टेलिकॉमसाठीचं स्पेक्ट्रमवाटप यांची सहज उपलब्धतता बड्या उद्योगपतींना आहे, हेही विसरता कामा नये. या व्यापक चित्रामध्ये वित्तीय उमरावशाहीकडून रोजगारविहीन विकासाच्या प्रक्रियेला वेग दिला जात असल्याचं दिसतं. विख्यात अर्थशास्त्रज्ञ अमित भादुरी यांनी नोंदवल्यानुसार अशा प्रकारच्या विकासाची पाककृती साध्या शब्दांत पुढीलप्रमाणे असते : प्रत्येकी दोन एककं निर्माण करणाऱ्या १० व्यक्ती किरकोळ-क्रयवस्तू उत्पादन अर्थव्यवस्थेमधून विस्थापित झाल्या आणि आठ एककं श्रम उत्पादकता असलेल्या पाच जणांना उद्योग क्षेत्रात रोजगार मिळाला, तर रोजगार व उपजीविकेच्या संधी कमी झालेल्या असतात आणि

उत्पादन दुप्पट झालेलं असतं. अशा प्रकारच्या औद्योगिक गुंतवणुकीला सवलत देण्यासाठी जमिनीसह सर्व नैसर्गिक स्त्रोत औद्योगिक कंपन्यांकडं स्वस्तात हस्तांतरित केले जातात. अवमूल्यन झालेल्या संपत्तीवर ताबा मिळवण्यासाठी राजकीय क्षेत्रानं केलेल्या या उपकाराची परतफेड म्हणून औद्योगिक समूह राजकीय पक्षांना मोठ्या वर्गण्या देतात. या प्रक्रियेमध्ये अशा वर्गण्या उपलब्ध न होणाऱ्या व्यक्तींना व पक्षांना निवडणुका लढण्याला प्रतिबंधच होईल इतका निवडणुकीचा खर्च वाढला आहे. अशा वेळी उद्योगक्षेत्राच्या नेतृत्वाखालील रोजगारविहीन विकास व तसलीच लोकशाही सबळ होत जाते ('ऑन द डेमॉक्रसी, कॉर्पोरेशन्स अँड इनइक्वालिटी', इपीडब्ल्यू, २६ मार्च २०१६).

ब्रिटिश काळापेक्षाही जास्त प्रमाणात उत्पन्नविषयक विषमता वाढली आहे, ही बूर्झ्वाशासित भारताची शोकात्मिका आहे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांमध्ये आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये झालेल्या वसाहतवादाच्या दीर्घकालीन अवनतीचा परिणाम म्हणून हा बूर्झ्वा वर्ग तयार झाला. या काळात वास्तव दरडोई उत्पन्नात घट होत होती आणि मानवनिर्मित दुष्काळामध्ये लाखो लोक पिडले जात होते, परंतु श्रीमंत लोक टिकून राहिले. तत्कालीन वसाहतवादाचं क्रौर्य व वांशिक उच्चतेची हानिकारक विचारसरणी, आणि आजची हिंदुत्वाची विचारसरणी व त्याचे हानिकारक परिणाम यांच्यात साम्य आहे. हिंदुत्वातून सांस्कृतिक सनातनीपणाची भयानक वाटचाल सुरू झाली, हे आहेच; शिवाय, राजकीय अवकाशात उजव्या टोकाला असलेला हा घटक आहे. या घटकामागची राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना निवडणुकीचं राजकारण व बेकायदेशीर हिंसा अशा पद्धतींचं मिश्र वापर करत असते. चॅन्सेल-पिकेटी यांच्या निबंधातून समोर आलेल्या विषम विकासाच्या आकडेवारीला कारणीभूत ठरणाऱ्या प्रारूपाला ज्यामुळे बाधा पोचेल अशा कोणत्याही गोष्टीला चिरडून टाकण्याचा या राजकीय शक्तीचा निर्धार आहे. ●

---

## खायला अन्न लागतं, रोकड नव्हे

*रेशनच्या अन्नधान्यांऐवजी रोकड देण्याचा निर्णय कुपोषण कमी करण्याच्या प्रयत्नांना बाधक ठरणार आहे.*

अनुदानित अन्न योजनांच्याऐवजी लक्ष्य गटांतील लाभार्थींकडं रोकड हस्तांतरण अथवा थेट लाभ हस्तांतरण करण्याचा प्रयत्न आत्तापर्यंत अनेक केंद्र सरकारांनी केला आहे. 'आर्थिक सर्वेक्षण २०१६-१७' या अहवालाच्या पहिल्या खंडातील 'सार्वत्रिक मूलभूत उत्पन्न' (युनिव्हर्सल बेसिक इन्कम) या प्रकरणात अशाच प्रयत्नांचा प्रतिध्वनी उमटलेला आहे. अलीकडं नीती आयोगाच्या 'भारताचं पोषण : राष्ट्रीय पोषण धोरण' या अहवालामध्ये एकात्मिक बालविकास सेवेअंतर्गत घरगुती रेशनव्यवस्थेऐवजी थेट रोकड हस्तांतरणाची व्यवस्था आणण्यासाठीचे मार्ग सुचवण्यात आले आहेत. केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयानंही या सूचनेचा गांभीर्यानं विचार सुरू केल्याची माहिती मिळते आहे. त्यानुसार रेशनव्यवस्थेला पर्याय उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. अंगणवाड्यांमध्ये तीन वर्षांखालील बालकांना, गरोदर वा स्तनपानदात्या मातांना अशा प्रकारे शिधा दिला जातो. त्याऐवजी मातांच्या 'जन-धन' बँक खात्यांमध्ये थेट रोकड भरण्याचा हा प्रस्ताव आहे. बालकुपोषणाचे सर्वांत वाईट परिणाम दिसणाऱ्या काही जिल्ह्यांमध्ये पहिल्यांदा ही अंमलबजावणी होणार आहे, आणि त्यानंतर वर्षभरानं उर्वरित ठिकाणी ही योजना अंमलात

येईल.

विद्यमान सरकारनं 'जनधन-आधार-मोबाइल' (जॅम) असं गरीबी निर्मूलनाचं मध्यवर्ती धोरण अंगिकारलेलं आहे, त्याला धरूनच रोकड हस्तांतरणाची ही संकल्पनाही मांडली गेली आहे. सुमारे ६७ टक्के भारतीय लोकसंख्येला अनुदानित दरामध्ये अन्नधान्य पुरवण्याचं काम सार्वजनिक वितरण व्यवस्था (रेशन) करते, आणि रोकड हस्तांतरणाद्वारे गंभीर बदल करण्यात आलेली पहिली केंद्रीय योजना रेशनचीच होती. सर्व राज्यांनी रेशनव्यवस्थेकडून थेट लाभ हस्तांतरण व्यवस्थेकडं जाण्याचा विचार करावा, असं आवाहन केंद्र सरकारनं केलं आहे. सध्या पुदुच्चेरी, चंदीगढ व दादरा-नगर हवेली या तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर नवीन योजना राबवण्यात येत आहे. अनुदानित अन्नपुरवठ्याच्या व्यवस्थेत गळती, खराब दर्जाचं अन्न व भ्रष्टाचार आहे, अशी कारणं पुढं करून रोकड हस्तांतरणाचं समर्थन केलं जातं. परंतु, प्रशासकीय सुधारणा आणि राजकीय इच्छाशक्ती असेल तर या आधीपासूनच्या योजनांमध्ये सुधारणा होऊ शकतात, हे पुरेशा पुराव्यानिशी सिद्ध होतं.

उदाहरणार्थ, २००४-०५ ते २०११-१२ या वर्षांमध्ये रेशन व्यवस्थेद्वारे होणारी घरगुती खरेदी ११७ टक्क्यांनी वाढली आणि गळतीचं प्रमाण ५४ टक्क्यांवरून ३५ टक्क्यांवर आलं, असं आर्थिक सर्वेक्षण अहवालात नोंदवलेलं आहे. म्हणजेच या योजनेची व्याप्ती वाढून कार्यक्षमताही सुधारल्याचं दिसून येतं. या आकडेवारीवरून २०१६ सालचा अंदाज बांधल्यास गळतीचं प्रमाण २०.८ टक्क्यांवर येण्याची अपेक्षा आहे. विशेष म्हणजे या वर्षांमध्ये तंत्रज्ञान आणि व्याप्तीविस्तार यांमध्ये आवश्यक त्या सुधारणा न होताही हे परिणाम दिसून आले आहेत. तीन केंद्रशासित प्रदेशांप्रमाणे सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या जागी रोकड हस्तांतरणाची व्यवस्था आली, तरी ही रोकड लाभार्थीपर्यंत पोचेल याची हमी मिळणार नाहीच. नीती आयोगाच्या नेतृत्वाखाली २०१७ साली झालेल्या सर्वेक्षणांमध्ये असं आढळून आलं की, लक्ष्यगटांतील ३५ टक्के लाभार्थींच्या खात्यात रोकड जमा झालीच नाही. त्यामुळं अन्नाच्या जागी रोकड आणल्यानं व्यवस्थेतील त्रुटी दूर होणार नाहीत, हे स्पष्ट आहे. रोकड योजनांनाही गळतीची लागण होईलच.

एकात्मिक बालविकास योजनेला स्रोतपुरवठ्याचाही तुटवडा जाणवतो आहे. सध्या गरोदर माता आणि नवजात अर्भक यांना ४५ महिन्यांच्या कालावधीत ७,१२५ रुपयांचा घरगुती शिधा (सरासरी १५८ रुपये प्रति महिना) मिळणं अपेक्षित आहे. २०११-१२ सालच्या किंमतींवर आधारित ही रचना आहे, आणि त्या वर्षीपासून यात काहीही सुधारणा करण्यात आलेली नाही. या शिधेच्या मूल्याची रक्कम आणि ग्राहक किंमत निर्देशांक यांचं गुणोत्तर जुळणारं असावं, अशी शिफारस नीती आयोगानं केलेली आहे. त्यानुसार, ६-७२ महिन्यांच्या बालकांसाठी प्रति दिवस ८ रुपये आणि गरोदर व स्तनपानदात्या मातांसाठी प्रति दिवस ९.५ रुपये असा सुधारित दर जाहीर करण्यात आला आहे. घरगुती शिधेची संपूर्ण पुरवठा व्यवस्था सुधारण्याच्या प्रक्रियेत हे वाढीव वाटप आणि महागाईनुसार दरात बदल करण्याचं आश्वासन ही चांगली सुरुवात आहे. परंतु सरकारी अनुदानित किंमतींमध्ये हा शिधा विकत घेतला जाईल तेव्हाच ही प्रक्रिया योग्य दिशेनं जात असल्याचं म्हणता येईल. बाजारपेठेतून खरेदीसाठी वापरल्या जाणाऱ्या रोकडीच्या संदर्भात या रकमा अतिशय अपुऱ्या आहेत. शिवाय, थेट रोकड हस्तांतरणामध्ये वाढीव खर्च आणि बँकेच्या शाखांपर्यंत जाण्याचा ताण या घटकांचीही भर पडेल.

एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत बहुतांश राज्यांमध्ये तीन ते सहा वर्षं वयोगटातील मुलांना गरम शिजवलेलं अन्न देण्याची व्यवस्था करण्यात आली. घरगुती शिधा वाटपापेक्षा असं थेट अन्न देणं जास्त परिणामकारक ठरतं. काही राज्यांनी महिला मंडळं व

महिलांच्या बचत गटांद्वारे घरगुती शिधेचं उत्पादन व वाटप करून विकेंद्रित व्यवस्था उभारल्या आहेत. परंतु या व्यवस्था अजूनही केंद्रीकरण झालेल्याच आहेत आणि त्यामध्ये भ्रष्टाचारही बोकाळला आहे. कंत्राटदार, राजकारणी व प्रशासकीय अधिकारी यांच्या संगनमतानं भ्रष्टाचार व गळती होत असल्याच्या वार्ता आल्यानंतर २००४ साली सर्वोच्च न्यायालयानं एकात्मिक बालविकास योजनेमध्ये अन्नपुरवठ्यासाठी खाजगी कंत्राटदारांवर बंदी आणली. तरीही, काही राज्यांमध्ये या योजनेत खाजगी कंत्राटदारांची सेवा स्वीकारण्यात येते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेप्रमाणे एकात्मिक बालविकास योजनेमधील अन्नवाटपामध्येही राजकीय व प्रशासकीय लक्ष घालण्याची गरज आहे.

एकतृतीयांश बालकं कुपोषित असलेल्या या देशामध्ये अन्नाच्या जागी रोकड आणण्याचा निर्णय घाईगडबडीत घेतला, तर त्यातून सर्वाधिक गरजूंच्या पोषणविषयक गरजपूर्तीमध्ये अडथळेच निर्माण होतील. एकात्मिक बालविकास योजना मुलांच्या पोषणातील तफावत दूर करण्यासोबत इतरही काही गोष्टींची पूर्तता करत असते. अंगणवाड्यांमध्ये पोषणविषयक समुपदेशन केलं जातं, वाढीवर देखरेख ठेवली जाते, गरोदरपणातील आरोग्यसेवा पुरवली जाते आणि रोगप्रतिकारक लसीकरणही केलं जातं. देशातील कुपोषण कमी करण्यासाठी बहुक्षेत्रीय हस्तक्षेपाची रूपरेषा आखून देण्याचं काम राष्ट्रीय पोषण अभियानानं केलं आहे, त्याद्वारे एकात्मिक बालविकास योजनेच्या सक्षमीकरणाची संधी उपलब्ध झाली आहे. सर्वाधिक गरजू मुलांपर्यंत अन्न पोचेल याची हमी रोकड वाटून मिळणार नाही. या वास्तवाची दखल घेऊन भविष्यातील धोरण आखलं जायला हवं. ●

---

## शिवारांमधलं विष

*विषकारक व अनियमित किटकनाशकांच्या वापरामुळं शेतकरी व मजुरांना जीव गमवावा लागत आहे.*

महाराष्ट्रातील विदर्भ प्रांतामध्ये मोठ्या प्रमाणावर विकासाचा तुटवडा असून मोठ्या प्रमाणावर शेतकी संकट निर्माण झाले आहे. या संकटाला तोंड देताना गेल्या १६ वर्षांमध्ये सहा जिल्ह्यांमधील सुमारे १४ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या वर्षी जुलै महिन्यापासून या प्रांताला आणखी एका संकटाला सामोरं जावं लागलं आहे. यवतमाळ जिल्ह्यात व इतरत्रही किटकनाषकांमुळं विषबाधा झाल्यानं लहान शेतकरी व शेतमजुरांना रुग्णालयात दाखल करावं लागलं. अगदी अलीकडंपर्यंत या घटनाक्रमाकडं सरकार किंवा प्रसारमाध्यमांचं लक्ष गेलेलं नव्हतं. परंतु ऑगस्टपासून १९ मृत्यू झाल्याची वार्ता पसरल्यावर हा घटनाक्रम अचानक प्रकाशात आला. शेतकरी आत्महत्या आणि शेतीच्या दुरावस्थेवरील लोकक्षोभ पाहाता राज्य व केंद्र सरकारांनी अशा घटनांबाबत अधिक जागरूक असायला हवं. याआधीही काही वर्ष अशा प्रकारच्या विषबाधेची प्रकरणं समोर आली होती, परंतु तरीही प्रतिबंधात्मक पावलं उचलण्यात आली नाहीत. या वर्षी झालेल्या एकूण ३० मृत्यूंपैकी १९ मृत्यू यवतमाळ जिल्ह्यातील आहेत. यानंतर तरी किटकनाशकांच्या नियमनाची आणि त्यांच्या वापरावर देखरेख ठेवण्याची निकडीची गरज आहे, हे यातून अधोरेखित होतं.

भारतात बीटी-कॉटनच्या विक्रीला २००२ साली मंजुरी मिळाली, तेव्हापासून कोरडवाहू विदर्भात या कापसाचं उत्पादन वाढत गेलं आहे. गेल्या वर्षी चांगली किंमत मिळाल्यानं विदर्भातील शेतकऱ्यांनी या वर्षी १६ ते १७ लाख हेक्टरांवर उत्साहानं कापसाची लागवड केली. गेल्या काही वर्षांमध्ये या प्रदेशात आणि भारतातील इतर भागांमध्येही किडीचा प्रादुर्भाव मोठ्या

प्रमाणात आढळतो आहे, निळ्या व गुलाबी बोंडअळीचा आढळही वाढला आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये व्हाइटफ्लाय किटक व गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव असलेल्या उत्तर व पश्चिम राज्यांमध्ये बीटी-कॉटनची परिणामकारकता निष्प्रभ ठरल्याचं दिसलं आहे. या किटकांनी बॉलगार्ड-दोनचा विध्वंस केलेला आहे. गुलाबी बोंडअळीनं २००९ सालीच बॉलगार्ड-एकबाबत प्रतिकाराची शक्ती कमावली होती. २०१५ साली गुजरात आणि तेलंगण, आंध्रप्रदेश व महाराष्ट्रातील काही भागांमध्ये बॉलगार्ड-दोनलाही या किटकानं उध्वस्त केलं. २०१५-१६मध्ये व्हाइटफ्लायची लागण झाल्यामुळं पंजाब व हरयाणामध्ये पिकांचं नुकसान झालं होतं. बीटी-कॉटननं जैविक परिणामकारकता गमावली असल्याचं अनधिकृतरित्या स्वीकारलं गेलं असलं, तरी सरकारनं या बियाणाला पर्याय देण्याचा वा त्याच्या विक्रीचं नियमन करण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नाही. उलट, बीटी-कॉटनच्या पिकाभोवती आवश्यक लागवड न केल्याबद्दल आणि किटकांच्या हल्ल्यांचं व्यवस्थापन न केल्याबद्दल शेतकऱ्यांनाच दोष दिला जातो आहे.

या वर्षी जुलै महिन्यात कापसाच्या पिकावर मोठ्या प्रमाणात किटकनाशकं फवारली जाण्यामागच्या मुख्य कारणांचं स्पष्टीकरण केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या अहवालात करण्यात आलं आहे. अनेक वर्ष कापसाचं पिकाची कापणी डिसेंबरमध्ये करण्याऐवजी मार्चपर्यंत हे पीक शेतातच उभं ठेवलं जात असे. परिणामी, गुलाबी बोंडअळीच्या चक्राला अडथळा केला जात नसे. साधारणपणे नोव्हेंबरच्या मध्यात पडणारी ही कीड काही वेळा पुढील मोसमात थोडी आधी येते. विशेषतः बागायती प्रदेशांमध्ये असं घडताना दिसतं. शिवाय, पूरक हवामान आणि वाढीसाठीची उत्प्रेरक औषधं यांमुळे झाडांना पर्णसंभारही मोठ्या प्रमाणात आला. गेल्या वर्षीपासून मोसान्टो राउन्डअप रेडी फ्लेक्स (आरआरएफ) या हर्बिसाइड वनस्पतीबाबत सहनशील असलेल्या बियाण्याचं बेकायदेशीर रूप बाजारात आल्यानं या घडामोडींची वेगळी बाजू समोर आली. कोणतंही नाव अथवा तपशील नसलेल्या आणि बियाण्याच्या गुणवत्तेविषयीची माहिती न नोंदवलेल्या पाकिटांमधून हे बनावट बियाणं विकलं जात असे. गुजरातमध्ये २००१मध्ये अशाच प्रकारच्या घटना घडल्या. तिथे नवभारत कंपनीनं मंजुरीच्या आधीच बेकायदेशीररित्या बीटी-कॉटन बियाणं विकलं. आंध्रप्रदेशातील तपासणी समितीनं दिलेल्या माहितीनुसार, कापसाच्या एकूण पिकापैकी १५ टक्के भागावर बनावट बियाण्याची पेरणी केलेली आहे. गेल्या वर्षी, आरआरएफ बियाणं विकसित करणाऱ्या मोन्सांटो या कंपनीनं 'जेनेटिक इंजिनियरिंग अप्रेजल कमिटी'समोरचा मंजुरी अर्जही मागं घेतला.

२००६ सालापासून दुय्यम किडीची वाढ झाल्यापासून कापसावरील किटकनाशकांचा वापर सातत्यानं वाढत गेला आहे, असं केंद्रीय कापूस संशोधन संस्थेतील वैज्ञानिकांनी म्हटलं आहे. बीटी-कॉटनच्या संकरीत बियाण्यांचे प्रकार आता दोन हजारांच्या घरात गेले आहेत आणि २०१३ साली संकरीत कापसाची लागवड करणाऱ्या प्रदेशात सुमारे ९५ टक्के वाढ झाली. त्यामुळं किटकनाशकांच्या वापरातही वाढ झाल्याचा अंदाज आहे. या वर्षी विदर्भात शोषक किटक आणि हिरवी व गुलाबी बोंड अशी अशांचा हल्लाच कापसावर झाला. यामुळं मोठ्या प्रमाणावर रसायनांचं मिश्रण करून पिकांवर फवारण्यात आलं. कापसाच्या पिकातलं- म्हणजे रोपांमधलं अंतरही आता कमी असतं, आणि पाच फुटांपेक्षा उंच वनस्पती नियमितपणे आढळत नसल्या तरी या बदलांमुळं किटकनाशकांची लागण फवारणी करणाऱ्या व्यक्तीला होण्याची शक्यता गंभीररित्या वाढली आहे.

किटकनाशकांचे विक्रेते हे या प्रक्रियेतील मध्यवर्ती घटक आहेत आणि निरक्षर शेतकऱ्यांना विषारी किटकनाशकं सुचवायला व विकायलाही ते अजिबात

कचरत नाहीत. प्रोफेनोफोस व सायपरमेथ्रीन ही न किटकनाशकं गेली काही वर्षं कापसावर फवारली जात आहेत, परंतु यातून अपंगत्व अथवा मृत्यू होऊ शकतो, हे वैज्ञानिक छाननीद्वारे सिद्ध झालेलं आहे. मोनोक्रॉटोफोस, सायपरमेथ्रीन व सिन्थेटिक पायरेथ्रॉइड्स या रसायनांच्या मिश्रणानं ही समस्या आणखी गंभीर बनते. पैसा वाचवण्यासाठी शेतकरी कोणतीही संरक्षक आयुधं न देता रोजंदारीवरील मजुरांना दर दिवशी मोठ्या प्रमाणात किटकनाशक फवारायला लावतात.

यवतमाळ व इतर जिल्ह्यांमधील ताजे मृत्यू हे केवळ विस्मृतीत गेलेली आकडेवारी बनून राहाणार असतील, तर ती मोठीच शोकांतिका म्हणावी लागेल. शेतमजुरांच्या सुरक्षेची तजवीज करणं, किटकनाशकांचं नियमन करणं, पुरेशी आरोग्यसेवा उभारणं आणि चांगल्या गुणवत्तेची बियाणं उपलब्ध करून देणं, यांसाठी सरकारनं मुळात विचार करायला हवा आणि शेतीव्यवस्थेतील विविध घटकांमधील व्यामिश्र प्रक्रिया समजून घेण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती दाखवायला हवी. ●

---

## प्राणघातक नियोजन

*मुंबईत २३ रेल्वे प्रवाशांचा मृत्यू झाल्यानंतर तरी नागरी नियोजनकर्ते काही धडा शिकतील का?*

मुंबईच्या पश्चिम उपनगरी रेल्वेमार्गावरच्या एलफिस्टन रोड स्थानकातील पादचारी पुलावर २३ लोकांचा मृत्यू झाला, ही भयंकर घटना २९ सप्टेंबरच्या सकाळी घडली. या भागातील बंद पडलेल्या गिरण्यांच्या जमिनीवर गेल्या दशकभरात उभ्या राहिलेल्या कार्यालयांमध्ये आणि व्यावसायिक संकुलांमध्ये जाणारे बहुसंख्य लोक या प्रवासी गर्दीत असतील. अनपेक्षितरित्या पाऊस कोसळू लागल्यामुळं या अरुंद पुलाच्या बाहेर पडण्याच्या रस्त्यामध्ये लोक थांबून राहिले, त्यामुळं मागून वर चढणाऱ्या प्रवाशांसाठी हा पूल मृत्यूचा सापळा बनला. या घटनेमुळं विविध पातळ्यांवरचं अपयश समोर आलं आहे. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अशा घटनांना प्रतिसाद देण्याबाबत कार्यक्षम नाही, वाढत्या प्रवासी लोकसंख्येच्या गरजांबाबत नियोजनाचा अभाव असल्यामुळं जमिनीचा वापर कोंडी वाढण्याला कारण देणारा ठरतो- अशा काही गंभीर समस्या यातून पुढं येतात. मुंबईसारख्या शहराला अनेक मानवनिर्मिती आपत्तींची सवय झाली आहे, परंतु यंत्रणेच्या बाबतीतील अपयश मुंबईसह देशातील बहुतांश नागरी केंद्रांमध्ये दिसतं. यामुळे मुंबईतून मिळणारे धडे इतर ठिकाणीही लागू होणारे आहेत.

देशाची आर्थिक राजधानी असलेलं मुंबई शहर आणि उपनगरी भाग यांच्या सहनशीलतेचा कडेलोट जवळपास दशकभरापूर्वीच झाला होता. परंतु, विस्तारीत उपनगरांमधील नवीन निवासी केंद्रांना दक्षिण व मध्य मुंबईतील व्यावसायिक अवकाशांशी जोडणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मात्र या बदलांचा वेग पकडू शकली नाही. शिवाय, या व्यावसायिक अवकाशांमध्येही अवजड वाहनं आणि पादचारी यांतून वाहतुकीची कोंडी होत असते. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) आणि रेल्वे प्रशासन अशा विविध अधिकारीसंस्थांमधील संयोजनाचा अभाव या कोंडीला अपायकारक ठरतो. मेट्रो व मोनोरेल प्रकल्पांनी वाढणारी स्थानकं या कोंडीत भरच टाकणार आहेत. मुंबईसाठीची नवीन प्रस्तावित विकास योजना ८० लाख लोकांना रोजगाराचा अवकाश पुरवण्यावर लक्ष केंद्रीत करते; आणि रेल्वे जाळ्यावरचा संभाव्य ताण कमी करण्यासाठी ही योजना मेट्रो व्यवस्था आणि वादग्रस्त किनारपट्टी रस्ता प्रकल्प यांच्यावरच अवलंबून आहे. हे अवास्तविक गृहितक आहे आणि वाढती मानवी व वाहनांची रहदारी या गृहितकाला न

पेलवण्याइतकी वाढणार आहे, असं मत नागरी वाहतूक तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे. पूर्व उपनगरांमध्ये मोनोरेल बांधल्यानंतरही उपनगरी रेल्वे वाहतुकीवरचा भार कमी झालेला दिसत नाही, तरीही या मोनोरेलबाबत तज्ज्ञांनी मांडलेल्या आक्षेपांकडे प्रशासनानं लक्ष दिलं नाही. त्याचप्रमाणे उपनगरी रेल्वे वाहतुकीची क्षमता वाढवण्याचं व्यापक उद्दिष्ट साध्य करण्यात मुंबई रेल्वे विकास महामंडळाला अपयश आलेलं आहे.

मुंबईची अनेक अनन्य वैशिष्ट्यं उपनगरी रेल्वे जाळ्याशी जोडलेली आहेत. स्त्रियांचं दळणवळण आणि रोज जवळपास २२ तास धावणाऱ्या ट्रेनमध्ये त्यांना मिळणारी 'सुरक्षितता', या शहराच्या चिवट प्रवृत्तीला (अलीकडच्या काळात ही प्रवृत्ती कमीच होते आहे) घडवणारा अतिशय विस्तृत व स्वस्त वाहतूकमार्ग, इथल्या श्रमजीवी व बुद्धिजीवी नोकरदार जनतेची कार्यनैतिकता, आणि फुलांपासून हेअरपिनापासून ते भाज्या, फळं व पुस्तकांपर्यंत सगळ्या गोष्टी विकणाऱ्या स्वयंरोजगारी व्यक्तींचं सूक्ष्म जाळं- अशी अनेक वैशिष्ट्यं या रेल्वेशी जोडलेली आहेत. पूर्वी नद्यांच्या किनाऱ्यांवर सभ्यता निर्माण होत, त्याप्रमाणे रेल्वे स्थानकांच्या भोवती निवासी व व्यावसायिक संकुलं उभी राहिलेली आहेत. यामध्ये बहुमजली इमारतीही आहेत आणि झोपडपट्ट्याही आहेत. परंतु दूरच्या उपनगरांमधील ही वाढ नियोजित केलेली किंवा नियमबद्ध नाही. शहराच्या मध्यवर्ती भागांमध्ये 'टॉवर'रूपी इमारती अनिर्बंधपणे उभ्या राहात आहेत आणि यातील रहिवासीच अरुंद व कोंडी झालेल्या रस्त्यांवर उतरत असतात.

दररोज लाखो लोक ट्रेनच्या डब्यांमधून कसाबसा श्वास घेत प्रवास करतात आणि जुनाट पुलांवरून या प्रचंड गर्दीचं वजन चालत असतं. या वस्तुस्थितीनंच अनेकांना भयग्रस्त वाटू शकतं. मुंबईच्या चिवटपणाचं कौतुक वारंवार केलं जातं आणि या लोकांवरही या चिकाटीला चिकटून राहाण्याची एक प्रकारे सक्तीच होत असते. उपनगरी रेल्वे व्यवस्थेतील प्रत्येक ट्रेनची प्रवासीक्षमता सतराशे आहे, परंतु प्रत्यक्षात सुमारे साडेचार हजार लोक एका ट्रेनमधून जातात आणि तरीही रोज सुमारे ७५ लाख प्रवाशांना वाहून नेताना ट्रेनसंख्येचा तुटवडा जाणवतो. पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे व हार्बर रेल्वे इथल्या प्रवाशांची संख्या वाढतच जात असल्यामुळं प्रचंड गर्दीच्या डब्यांमधून पडून मरणाऱ्यांची आणि रुळ ओलांडताना मरणाऱ्यांची संख्याही भयंकर मोठी आहे. अनेक ठिकाणी पादचारी पूल अस्तित्त्वातच नाहीत, काही ठिकाणी ते जुने व अपुरे आहेत, काही ठिकाणी ते लांब फलाटाच्या एका कोपऱ्यात आहेत, यामुळं पुलापेक्षा रुळावरून पलीकडं जाण्याचा मार्ग अनेक प्रवासी पत्करतात. अशा मृत्यूंची संख्या दिवसाकाठी दहा इतकी आहे. २०१६ साली मुंबईमध्ये रेल्वेप्रवासात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीची संख्या ३,२०२ होती, तर जखमींची संख्या ३,३६३ होती आणि या वर्षी आत्तापर्यंतच्या अपघाती मृत्यूंची संख्या १,६१८ इतकी आहे.

इतर अनेक प्रलंबित समस्यांप्रमाणे याही समस्येवरही अनेक उपायांची गरज आहे. रेल्वे रुळांची व सिग्नल व्यवस्थेची अधिक चांगली देखरेख, उपनगरी रेल्वे जाळ्यासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना, रेल्वेवरचा भार कमी करण्यासाठी बहुआयामी वाहतूक व्यवस्थेची निर्मिती आणि पूर्व-पश्चिम मार्गांची निर्मिती- अशा विविध स्तरांवरच्या उपायांची आवश्यकता आहे. मुंबईची पूर्वीची विख्यात 'निषेध' संस्कृती आता 'स्वीकार' प्रवृत्तीमध्ये बदलून गेली आहे. राजकारणी लोकांनी सक्षम नियोजन करावे आणि वर नोंदवलेले उपाय अंमलात आणावेत याची मागणी नागरिकांनीच करायला हवी. ●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.

(३० सप्टेंबर तसेच ७ व १४ ऑक्टोबर या अंकांतून)